वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या मानवी जीवितहानी, मानवी इजा, पशुधनाची हानी तसेच शेतीपिके, फळझाडे व मालमत्तेच्या नुकसानीपोटी देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईच्या विद्यमान दरांचा आढावा घेऊन त्यामध्ये वाढ करण्याबाबत समिती गठित करण्याविषयी.

महाराष्ट्र शासन
वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्युएलपी ०२.२३/प्र.क्र.५२/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १९.११.२०२६.

वाचा :- महसूल व वन विभागाच्या महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजीची अधिसूचना

प्रस्तावना :-

राज्यातील अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने व इतर वनक्षेत्रांच्या परिसरातील तसेच वन्यप्राण्यांच्या वावराच्या क्षेत्रातील नागरी व ग्रामीण वस्तीमध्ये मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमुळे नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण होत आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे मानवी जीवितहानी, मानवी इजा, पशुधनाची हानी तसेच शेतीपिके, फळझाडे व इतर मालमत्तेचे नुकसान होत असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत.

विशेषतः कोकण विभागातील भौगोलिक परिस्थिती, वनक्षेत्रालगत असलेली मानवी वस्ती, शेती व फळबागांचे स्वरूप आणि वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीचा आर्थिक परिणाम विचारात घेता, नुकसानभरपाईच्या विद्यमान दरांचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने लोकप्रतिनिधींकडूनही नुकसानभरपाईच्या रकमेत वाढ करण्याबाबत मागण्या करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अंतर्गत नुकसानभरपाईचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन, विद्यमान नुकसानभरपाईच्या दरांचा आढावा घेणे व त्यामध्ये आवश्यक वाढ करण्याबाबत शासनास शिफारशी सादर करण्यासाठी समिती गठित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :- महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अंतर्गत नुकसानभरपाईचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत. विद्यमान नुकसानभरपाईच्या दरांचा आढावा घेणे व त्यामध्ये आवश्यक वाढ करण्याबाबत शासनास शिफारशी सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

समितीची संरचना

अ.क्र.	पदनाम	समितील स्थान
१	अपर मुख्य सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर	सदस्य
३	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर	सदस्य
४	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (पूर्व), महाराष्ट्र राज्य,नागपूर	सदस्य
५	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (पश्चिम), महाराष्ट्र राज्य,मुंबई	सदस्य
६	सह सचिव /उप सचिव (वने),वन विभाग,मंत्रालय,मुंबई	सदस्य
७	विशेष कार्य अधिकारी (वने), वन विभाग,मंत्रालय,मुंबई	सचिव
८	उप वनसंरक्षक (नियोजन व व्यवस्थापन),प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय	सदस्य सचिव

२. समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :

अ) वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या मानवी जीवितहानी, मानवी इजा, पशुधनाची हानी, शेतीपिकांचे नुकसान, फळझाडांचे नुकसान व मालमत्तेचे नुकसान यांसाठी सध्या लागू असलेल्या नुकसानभरपाईच्या दरांचा आढावा घेणे.

ब) विविध प्रकारच्या नुकसानीसाठी नुकसानभरपाईच्या दरांमध्ये किती वाढ आवश्यक आहे, याबाबत वस्तुनिष्ठ निकषांच्या आधारे शिफारशी करणे.

क) विशेषतः कोकण विभागासह राज्यातील मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांची वारंवारता, नुकसानीचे स्वरूप, बाधित शेतकरी व नागरिकांची संख्या आणि त्यावरील आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

ड) शेतीपिकांचे व फळझाडांचे नुकसान निश्चित करण्यासाठी पीकनिहाय, क्षेत्रनिहाय व बाजारमूल्याधारित निकष आवश्यक आहेत काय, याचा विचार करणे.

इ) नुकसानभरपाई मंजूर करण्यासाठीची विद्यमान कार्यपद्धती, पंचनामे, नुकसान मूल्यांकन, अर्ज निकाली काढण्याची कालमर्यादा व निधी वितरण प्रक्रियेतील अडचणींचा आढावा घेणे.

फ) नुकसानभरपाईच्या दरांमध्ये वाढ केल्यास शासनावर येणाऱ्या संभाव्य अतिरिक्त आर्थिक भाराचे मूल्यांकन करणे.

ग) आवश्यकतेनुसार संबंधित कायदे, नियम, अधिसूचना व शासन निर्णयांमध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारशी करणे.

घ) वन्यप्राण्यांमुळे वारंवार नुकसान होणाऱ्या क्षेत्रांसाठी विशेष उपाययोजना आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत सूचना करणे.

उपरोक्त समितीने शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून **तीन** महिन्यांच्या आत आपला सविस्तर अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१११९१५१०४७७५४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIDHAR VIKRAM DESHMUKH

Digitally signed by SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=D3DD41251A6E229D40D43D90520B8D2A921AE59C8013644628B65C38D28868D8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=912CC46938BC6D9CF9A14E38D8B09ED7F8FD6E5EE2A4A245C1C55A32E6315D48, cn=SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
Date: 2026.11.19 15:12:06 +05'30'

(श्रीधर देशमुख)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शाासन

प्रति :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर
११. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर / पश्चिम, मुंबई.
१२. क्षेत्र संचालक व्याघ्र प्रकल्प, सर्व
१३. मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
१४. वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली
१५. उपवनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव) सर्व.
१६. फ-१ कार्यासन, वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती)